सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२४ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## सीएम ओमर अब्दुल्लांनी घेतली गृहमंत्री अमित शाहांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२४ नवी दिल्ली**



नुकत्याच पार पडलेल्या जम्मू-काश्मीर () विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्सच्या नेतृत्वातील सरकार स्थापन झाले. दरम्यान, या केंद्रशासित प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आज( बुधवारी, २४ ऑक्टोबर २०२४) नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये विविध मुद्यांवर चर्चा झाली.

ओमर अब्दुल्ला बुधवारी दुपारीच श्रीनगरहून दिल्लीला रवाना झाले होते. ओमर अब्दुल्ला यांनी दुजोरा दिला नसला तरी, त्यांच्या जवळच्या लोकांनी सांगितले की, ओमर अब्दुल्ला यांनी गृहमंत्र्यांसोबत जम्मू-काश्मीर आणि काश्मीरमध्ये विविध पायाभूत सुविधा प्रकल्प आणि लोककल्याणकारी योजना पुढे नेण्यासाठी केंद्र सरकारकडून नियमित निधी मिळण्याबाबत चर्चा केली. याशिवाय, हिवाळ्यात काश्मीर खोऱ्यात सर्वत्र बर्फ पसरतो, अशा परिस्थितीत वीज पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सहकार्याची विनंती केली आहे.

**बैठकीनंतर ओमर अब्दुल्ला काय म्हणाले ?**

जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याबाबत राज्य मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या ठरावाचीही अमित शाहांना माहिती दिल्याचे ओमर यांनी सांगितले. तसेच, जम्मू-काश्मीरच्या लोकांना आशा आहे की, केंद्र सरकार या संदर्भात दिलेले आश्वासन लवकरच पूर्ण करेल. श्रीनगर-बनिहाल-कटरा-जम्मू-दिल्ली रेल्वे कनेक्टिव्हिटी लवकर पुनर्संचयित करणे आणि झेड मॉड टनेल प्रकल्पाच्या उद्घाटनाशी संबंधित समस्याही त्यांनी गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

## फ्लॉवर, ढबू, हिरवी मिरची...; ही बाजारातून आणायच्या भाज्यांची लिस्ट नाही, ही आहेत निवडणूक चिन्हे

### विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारांसाठी १९० चिन्हे जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

हिरवी मिरची, नरसाळे, झगा, पॅन्ट, फणस, प्लॉवर, कोल्हापुरी पायताण, उड्या मारण्याची दोरी, कॅरम, स्वीच बोर्ड, लोकर व सुई, पक्कड, ड्रील मशीन.. अहो तुम्हाला ही घरातील साहित्यांची यादी वाटत असेल तर जरा थांबा. या दैनंदिन गरजेच्या वस्तू कितीही महाग झाल्या असल्या तरी निवडणूक आयोगाने मात्र विधानसभा निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारांवर चिन्हांच्या रुपाने मुक्तहस्ताने उधळण केली आहे. यातील काही चिन्हे पारंपरिक, काही बदलत्या काळाला अनुसरून, तर काही अगदीच मजेशीर आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवारी अधिसूचना जाहीर



होताच निवडणूक विभागाने विधानसभा मतदारसंघांसाठी अर्ज भरण्यात येणाऱ्या कार्यालयांबाहेर राष्ट्रीय पक्षांचे राखीव चिन्ह व अपक्ष उमेदवारांसाठीचे मुक्त चिन्हांचे मोठी चित्रच लावली आहेत. यातील बरीचशी चिन्हे अगदीच मजेशीर आहेत.

**चिन्हांचा प्रभाव : ओळख आणि टवाळखोरीही**

या निवडणूक चिन्हांचा मतांवर मोठा प्रभाव पडतो. उमेदवाराची फारशी माहिती नसलेला मतदार चिन्ह लक्षात ठेवून त्यासमोरील बटन दाबतो. लोकसभेला तुतारी आणि पिपाणीतील फरक न कळल्याने मोठा घोळ झाला होता. तुतारीऐवजी पिपाणीचा उमेदवार मते खाऊन गेला, असे बऱ्याच मतदारसंघात घडले. हे चिन्हच पुढील काही काळासाठी उमेदवाराची ओळख बनून राहते. काही वेळा त्यांना उमेदवारांकडून गमतीशीर विनोद आणि टवाळखोरीलाही सामोरे जावे लागते.

**..अशी आहेत चिन्हे**

फळे व भाज्या : सफरचंद, फणस, अक्रोड, कलिंगड, फ्लॉवर, ढबू मिरची, हिरवी मिरची, फळांची टोपली, मटार भुईमूग, केक, द्राक्षे, चॉकलेट, आलं, भेंडी, पाव, दागिने, कपडे : कानातले, नेकलेस, बांगड्या, अंगठी. कोट, बूट, कोल्हापुरी चप्पल, बेल्ट, अन्य साहित्य : दाढी करण्याचे रेझर, पंचिंग मशीन, स्वीच बोर्ड, खिडकी, कपडे अडकविण्यासाठी भिंतीची पट्टी, स्कूल बॅग, उशी, किचनमधील सिंक, करवत, हातगाडी, विटा, खाट., टीव्ही, लॅपटॉप, वॉशिंग मशीन, जातं, पोळपाट बेलन, टोस्टर.

## सर्वच पक्षांमध्ये घराण्यांचा सुळसुळाट, दिग्गज नेत्यांच्या पोराबाळांना तिकीट, भावांनाही गोंजारलं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी सर्वच पक्ष मैदानात उतरले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीचे जागावाटप झालेले नसले तरी अनेक पक्षांनी उमेदवार यादी जाहीर केली आहे. भारतीय जनता पक्षाने ९९ जणांची नावे जाहीर केली आहेत. शिंदेंच्या शिवसेनेने ४५ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ३८ उमेदवार जाहीर केले आहेत. याशिवाय ठाकरेंच्या शिवसेनेने ६५ जणांना तिकिट जाहीर केलं आहे. मात्र, काही जागांमध्ये दुरुस्ती केली जाणार असल्याचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केलं आहे.

**सर्वच पक्षांमध्ये घराणेशाही वाढली, प्रस्थापित नेत्यांच्या मुलांना उमेदवारी**

अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ३८ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये त्यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या कन्या आदिती तटकरे श्रीवर्धनमधून उमेदवारी मिळाली आहे. तर सुनील तटकरे यांच्या मुलाला भारतीय जनता पार्टीकडून पेनमधून उमेदवारी मिळेल अशी चर्चा सुरु आहे. याशिवाय अजित पवारांनी छगन भुजबळ यांना येवला विधानसभा मतदारसंघातून यादी जाहीर करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी पंकजा भुजबळ यांना राष्ट्रवादीने विधान परिषदेवर संधी दिली आहे.

**गणेश नाईक भाजपकडून लढणार, मुलाला शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारी**

नवी मुंबईतील भाजपचे ज्येष्ठ नेते गणेश नाईक यांचे पुत्र संदीप नाईक यांनी दोन दिवसांपूर्वी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. ते आता बेलापूर विधानसभा मतदारसंघातून लढणार आहेत. तर गणेश नाईक स्वत: ऐरोली




विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत. त्यामुळे मुलगा राष्ट्रवादीकडून तर वडील भाजपकडून निवडणूक लढत आहेत.

**राणे कुटुंबही दोन वेगवेगळ्या पक्षात, २ जणांना उमेदवारी मिळणार**

खासदार नारायण राणे सध्या भारतीय जनता पक्षात आहेत. मात्र, त्यांचे दोन्ही पुत्र वेगवेगळ्या पक्षात असणार आहेत. नितेश राणे यांना भाजपकडून कणकवली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर नारायण राणेंचे दुसरे पुत्र आणि माजी खासदार निलेश राणेही विधानसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहेत. निलेश राणे कुडाळ-मालवण विधानसभेतून लढण्यासाठी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.

**अशोक चव्हाणांच्या मुलीला तिकीट**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी लोकसभा निवडणुकीवेळी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर भाजपने त्यांना राज्यसभेवर संधी दिली होती. आता भाजपने अशोक चव्हाण यांची मुलगी श्रीजया चव्हाण यांना भोकरमधून उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे घराणेशाहीला नेहमी विरोध करणाऱ्या भाजपने अनेक नेत्यांच्या मुलांना तिकीट दिली आहेत.

**उद्धव ठाकरेंचे पुत्रही निवडणुकीच्या रिंगणात**

उद्धव ठाकरेंनी गेल्या विधानसभा निवडणुकीतच त्यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांना मैदानात उतरवले होते. आता वरळी विधानसभा मतदारसंघातून पुन्हा एकदा ते मैदानात उतरणार आहेत. त्यांच्याविरोधात मनसेने संदीप देशपांडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र अद्याप महायुतीकडून उमेदवार जाहीर करण्यात आलेला नाही. याशिवाय उद्धव ठाकरे स्वत: विधानपरिषदेचे आमदार आहेत.

**राज ठाकरेंकडून अमित ठाकरेंना उमेदवारी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहीममधून उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र, अमित ठाकरेंना तिरंगी लढतीला सामोरे जावे लागणार आहे. अमित ठाकरेंविरोधात एकनाथ शिंदेंनी सदा सरवणकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. याशिवाय, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनेही माहीममधून उमेदवार दिला आहे.

**धनंजय महाडिकांच्या कुटुंबात दोघांना उमेदवारी मिळणार ?**

कोल्हापुरात भाजप नेते धनंजय महाडिक यांच्या घरातही दोघांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. यापूर्वीच भाजपने अमल महाडिक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर कृष्णराज महाडिक यांनाही भाजपकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोल्हापुरात महाडिक घराण्यातही दोघांना उमेदवारी मिळवण्याची शक्यता आहे.

**एकनाथ शिंदेकडून रवींद्र वायकर यांच्या पत्नीला तिकीट**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून रवींद्र वायकर यांच्या पत्नीला उमेदवारी देण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत रवींद्र वायकर यांनी अमोल कीर्तिकर यांचा पराभव केला होता. त्यानंतर रवींद्र वायकर यांच्या जागेवर त्यांच्या पत्नीला मनीषा वायकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

**निलेश लंके यांच्या पत्नीला शरद पवारांकडून उमेदवारी निश्चित**

अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून निलेश लंके यांनी सुजय विखे यांचा पराभव केला होता. त्यानंतर पारनेर विधानसभा मतदारसंघात त्यांच्या पत्नी राणी लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राणी लंके या पारनेर विधानसभा मतदारसंघातून शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार असणार आहेत.

**आशिष शेलार यांच्या भावाला भाजपकडून तिकीट**

भाजपचे नेते आशिष शेलार यांना वांद्र पश्चिममधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. याशिवाय भाजपने आशिष शेलार यांच्या भावाला देखील मैदानात उतरवले आहे. त्यामुळे भाजपने अनेक कुटुंबात दोघांना उमेदवारी दिली आहे.

**संदीपान भुमरे यांच्या मुलाला तिकीट**

संदीपान भुमरे यांनी लोकसभा निवडणुकीत औरंगाबादमधून विजय मिळवला होता. आता त्यांच्या मुलीला एकनाथ शिंदेंकडून विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी देण्यात आली आहे.

**गणपत गायकवाड यांच्या पत्नीला तिकीट**

भाजप नेते गणपत गायकवाड यांनी कल्याणमध्ये शिंदे गटाचे नेते महेश गायकवाड यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार केला होता. त्यानंतर ते जेलमध्ये गेले होते. भाजपने त्यांच्या पत्नीला उमेदवारी दिली आहे.

**अभिजीत अडसूळ यांना उमेदवारी**

शिंदेंच्या शिवसेनेचे नेते आनंद अडसूळ यांच्या मुलाला देखील उमेदवारी देण्यात आली आहे. आनंद अडसूळ यांचे पुत्र अभिजीत अडसूळ शिंदेंच्या तिकीटावर विधानसभा निवडणूक लढणार आहेत.

**रामदास कदम यांच्या मुलाला उमेदवारी**

एकनाथ शिंदेंनी रामदास कदम यांच्या मुलालाही उमेदवारी जाहीर केली आहे. योगेश कदम हे दापोलीमधून विधानसभा निवडणूक लढणार आहेत.

**उदय सामंत यांच्या भावाला तिकीट**

मंत्री उदय सामंत स्वत: निवडणुकीच्या रिंगणात असताना त्यांचे बंधू देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. शिंदेंच्या शिवसेनेने त्यांच्या भावाला उमेदवारी जाहीर केली आहे.

**रावसाहेब दानवे यांच्या मुलाला दुसऱ्यांना उमेदवारी**

रावसाहेब दानवे यांनी जालना लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यामध्ये त्यांचा पराभव झाला होता. भाजपने त्यांचा मुलगा संतोष दानवे यांना भोकरदनमधून उमेदवारी जाहीर केली. यापूर्वी देखील संतोष दानवे या मतदारसंघातून निवडून आले होते.

## असा असणार महायुतीचा जाहीरनामा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

राज्यात विधानसभेचं बिगूल वाजलं आहे. येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. महायुतीच्या तीनही घटक पक्षांकडून आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. ज्यामध्ये भाजपनं ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे, तर राष्ट्रवादी अजित पवार गटानं ३८ आणि शिवसेना शिंदे गटानं ४५ उमेदवारांची नावं आपल्या पहिल्या यादीमध्ये जाहीर केली आहेत. मात्र अजूनही अशा काही विधानसभेच्या जागा आहेत, ज्यावर अद्यापही तोडगा निघाला नसल्यानं तिथे महायुतीचा उमेदवार ठरलेला नाही.

या विधानसभा मतदारसंघावर महायुतीमधील एका पेक्षा अधिक उमेदवारांनी दावा केला आहे. आता हा तिढा दिल्ली दरबारीच सुटण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी आज बैठक बोलावली आहे, या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती आहे.

दरम्यान महायुतीच्या जाहीरनाम्याबाबत देखील महत्त्वाची माहिती समोर आली आहे. महायुतीमधील घटक पक्ष असलेले भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी आपला वेगवेगळा जाहीरनामा सादर करणार नसून, एकच जाहीरनामा सादर करणार आहेत. पुढच्या आठवड्यात महायुतीचा जाहीरनामा समोर येण्याची शक्यात आहे. तसेच विधानसभा निवडणुकीसाठी तीनही पक्ष वेगवेगळा प्रचार करणार नसून, एकत्रच प्रचार देखील केला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.

## अजित पवार गटाकडून घड्याळ चिन्हावर 'न्यायप्रविष्ठ'चा उल्लेख नाही

### सुप्रीम कोर्टाचे अजित पवार गटाला निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ नवी दिल्ली**

अजित पवार गटाकडून घड्याळ चिन्हावर 'प्रकरण न्यायप्रविष्ट' असा उल्लेख होत नसल्याने आज शरद पवार गटाकडून सर्वोच्च न्यायालयामध्ये दाद मागण्यात आली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही गटांना खडसावत आम्ही दिलेला सूचनांचे पालन करा, अन्यथा आम्ही स्वतःहून अवमान ठपका ठेवू असा इशारा दिला. अजित पवार गटाने सर्व सूचनांचे पालन करत असल्याचे सांगत प्रतिज्ञापत्र आणि पुरावे सादर करू असं आश्वासन दिलं.

**अटींचे पालन अजित पवार गटाकडून झालेलं नाही**

शरद पवार गटाकडून करण्यात आलेल्या तक्रारीनंतर अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाकडून नव्याने प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शरद पवार गटाकडून अभिषेक मणून




सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये युतीवाद केला. यावेळी बोलताना अभिषेक मनू सिंघवी म्हणाले की, घड्याळ हे चिन्ह दोघांपैकी कोणालाही मिळू नये अशी आमची मागणी होती. मात्र, तुम्ही १९ मार्च रोजी हे चिन्ह बहाल करताना काही अटी घातल्या होत्या. मात्र, त्या अटींचे पालन अजित पवार गटाकडून झालेलं नाही याकडे सिंघवी यांनी लक्ष वेधले. ते म्हणाले की अजित पवार गटाकडून सूचनांचं पालन करण्यात आलेलं नाही. तसेच शरद पवार यांच्या नावाचाही वापर होऊ नये असा आदेश होता. मात्र, घड्याळ हे चिन्ह अजूनही शरद पवार या नावाशी जोडले गेले आहे.

## महायुतीच्या बंडखोरांवर अमित शाहांचे लक्ष शिंदे-फडणवीस-पवारांना दिल्या विशेष सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीला अवघे काही दिवस उरले आहेत. दरम्यान, जागावाटपाबाबत महायुतीतील पक्षांमध्ये सातत्याने बैठका सुरू आहेत. गुरुवारी(दि. २४) दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दिल्लीतील निवासस्थानी महायुतीची मोठी बैठक झाली. या बैठकीत वाद असणाऱ्या जागांवर निर्णय होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या बैठकीत अमित शाहांनी महायुतीतील बंडखोरांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.



अमित शांहासोबत बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. सूत्रांच्या हवाल्याने मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात येतोय की, अमित शाहांची नजर महायुतीच्या बंडखोरांवर आहे. महायुतीच्या कुठल्याही पक्षाचे बंडखोर उभे राहणार नाहीत, याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. मतविभाजन टाळण्यासाठी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने एकजुटीने निवडणुका लढवण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेनेदेखील आपल्या ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. उर्वरित उमेदवारांबाबत दिल्लीत अंतिम निर्णय होणार आहे.महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. तर, २३ नोव्हेंबर २०२४ ला निकाल लागेल.

## संपादकीय ......

# महामार्गांवरील टोल वसुलीचे नवे

महामार्गांवरील टोल आकारणीबाबत ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टिम अर्थात जीएनएसएस ही नवीन प्रणाली लागू करण्यात येणार आहे. सध्या बंगळूर-म्हैसूर आणि पानिपत-हिसार महामार्गावर याची चाचणी सुरू झाली असून त्याचे सकारात्मक परिणाम हाती पडत आहेत. कालांतराने संपूर्ण देशभरात ही पद्धत लागू होणार आहे. सध्या नॅशनल हायवे ॲथोरिटी ऑफ इंडियाला सुमारे ४० हजार कोटी रुपयांचा महसूल टोलच्या माध्यमातून मिळतो आणि ही सिस्टीम लागू झाल्यानंतर हे उत्पन्न १ लाख ४० हजार कोटी रुपयांवर जाण्याची अपेक्षा आहे.

महामार्गांवर ठरावीक अंतरावर दिसणार्या टोल नाक्यांच्या जाळ्यातून वाहनधारकांची लवकरच सुटका होणार असल्याची चर्चा आहे. याचा अर्थ टोल वसुली बंद होणार नाहीये, तर वाहनधारकांना टोल भरावाच लागेल; पण त्यासाठी टोल नाक्यांवर थांबण्याची गरज उरणार नाही. यासाठी जीएनएसएस तंत्रज्ञान पद्धतीचा वापर केला जाणार आहे. सध्या देशातील दोन महामार्गांवर ही प्रणाली लागू केली आहे. टोल संकलनाची ही नवी व्यवस्था आहे. महामार्गावरून प्रवास करत असाल, तर गाडीचा टोल आपोआप कापून घेतला जाईल. ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम (जीएनएसएस) जीपीएस आधारित काम करेल. यासाठी केंद्रीय रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने नियम जारी केले आहेत. 'जीएनएसएस'युक्त वाहनांना २० किलोमीटरपर्यंत राष्ट्रीय परवाना असलेल्या वाहने वगळता अन्य जीपीएसयुक्त वाहन राष्ट्रीय महामार्गाचा एखादा भाग वापरत असेल, तर त्या गाडीला एका दिवसात एका दिशेने वीस किलोमीटरपर्यंतचा प्रवास मोफत राहील आणि कोणताही टोल आकारला जाणार नाही. याशिवाय वाहन जेवढा लांबचा पल्ला गाठेल, तेवढ्या प्रमाणात टोल भरावा लागेल. गाडी 'जीएनएसएस' तंत्रज्ञानयुक्त असेल, तरच लाभ मिळणार आहे. वाहनात ऑन बोर्ड युनिट 'ओबीयू' किंवा ट्रॅकिंग उपकरण बसवावे लागेल. हे उपकरण चार हजार रुपयांना असून ते मालकाला स्वत:च बसवावे लागेल. सध्या या व्यवस्थेची अंमलबजावणी हायबिड मोड म्हणजेच कॅश, फास्टॅग अणि ऑटोमेटिक नंबर प्लेट रिकॉग्निशन-एनपीआरवर काम करेल.

जीएनएसएसमध्ये पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालणार्या उपग्रहांच्या समूहाचा समावेश असून ते अवकाश आणि वेळ यांचा समन्वय साधत स्थानाची माहिती देत असतात. ग्राऊंड कंट्रोल स्टेशनवरील नेटवर्क आणि रिसिव्हर हे ट्रायलेटरेशनच्या माध्यमातून ग्राऊंड पोजिझशनचे आकलन करतात. जीएनएसएस तंत्रज्ञानाचा वापर सर्व प्रकारच्या वाहनांत केला जातो. जीएनएसएस हे अवकाश स्थानक, विमान, सागरी मार्ग, रेल्वे, रस्ते आणि सार्वजनिक वाहतूक, स्थान, नेव्हिगेशन आणि दूरसंचार, भूमी सर्वेक्षण, सक्तवसुली संचालनालय, आपत्कालीन प्रतिसाद, कृषी उत्पादन, खाण, आर्थिक व्यवहार, शास्त्रीय संशोधन आदी महत्त्वाच्या कामात भूमिका बजावते. याचा वापर कॉम्प्युटर नेटवर्क, हवाई वाहतूक, पॉवर ग्रीड आणि अन्य घटकांना नियंत्रित करण्यासाठी केला जातो. 'जीएनएसएस' या नव्या पद्धतीत टोल वसुलीमुळे प्रवास चांगला आणि वेगवान होण्याची शक्यता आहे, तरीही लोकांत या सिस्टीमवरून संभ-म आहे. कारण, सध्याची टोल भरणा प्रणाली फास्टॅग बंद होईल की सक्रिय राहील, यावरून स्पष्टता नाही. क्रिसिलने म्हटले, फास्टॅगला बदलले जाणार नाही; मात्र कदाचित फास्टॅगच नव्या पद्धतीसह लागू केले जाईल. सध्या अंमलात आणलेले नवे नियम कोठे लागू होतील, हेही उघड झालेले नाही. जीएनएसएस टोल असणार्या सिस्टीमला देशभरात लागू कण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली जात आहे. काम पूर्ण होताच ही सिस्टीम सुरू होईल. प्रारंभीच्या टप्प्यात जीएनएसएस टोल सिस्टीम केवळ व्यावसायिक गाड्यांवरच लागू होईल. देशातील कोणतेही महामार्ग व एक्स्प्रेस वेवर दररोज वीस किलोमीटरपर्यंतचा प्रवास (ये-जा) करण्यासाठी टोल आकारला जाणार नाही; पण एखाद्याने २१ किलोमीटरपर्यंतचा प्रवास केला असेल, तर पहिल्या किलोमीटरपासून टोल आकारला जाईल.

जीएनएसएस हे दोन तंत्रज्ञानावर आधारित आहे. पहिले तंत्रज्ञान वाहनांतील जीपीएस ट्रॅकिंग प्रणालीवर आधारित आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने महामार्गावरील उपग्रहाद्वारे वाहन मालकाच्या खात्यातून थेट टोलचे पैसे कापले जातील. दुसरे तंत्रज्ञान नंबर प्लेटवर आधारित आहे. नंबर प्लेटवर टोलसाठी संगणकीकृत प्रणाली असेल आणि ती सॉफ्टवेअरच्या मदतीने टोल वसूल करण्यात मदत करेल. या तंत्रज्ञानात महामार्गावर वाहन कोणत्या पॉईंटवरून प्रवेश करेल, त्याची माहिती नोंदविली जाईल. यानंतर गाडी ज्या पॉईंटवर जाईल, तिथेही नोंदणी केली जाईल. यादरम्यान महामार्गावर वाहनाने किती किलोमीटर प्रवास केला, या आधारे गाडी मालकाच्या खात्यातून टोल काढून घेतला जाईल.

महामार्ग तज्ज्ञांच्या मते, जीएनएसएस लागू झाल्यानंतर महामार्गावर प्रवेश करणे हाच टोलचा एंट्री पॉईंट असेल. महामार्गाचा स्पर्श होताच मीटर सुरू होईल. स्थानिक लोकांना टोल गेटने वीस किलोमीटरपर्यंत जाण्याची मुभा आहे. २१ किलोमीटरपासून टोलची गणना सुरू होईल. प्रत्येक टोल नाक्यावर एक राखीव मार्ग जीएनएसएस डेडिकेटेड असेल आणि त्या गेटमधून केवळ जीएनएसएसच्या गाड्या जातील. नव्या सिस्टीमसाठी सर्व गाड्यांत जीएनएसएस ऑनबोर्ड युनिट असणे गरजेचे आहे. सध्या नवीन गाड्यांत ही सुविधा दिली जात आहे. यात तत्काळ मदतीसाठी पॅनिक बटण आहे. अन्य गाड्यांत ही सिस्टीम बसवावी लागणार आहे.

# 'उमेद'च्या विक्री स्टॉलला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

## बचतगटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे केले कौतुक



**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती** : उमेद-ग्रामीण महिला स्वयंसहायता समुहांनी दिवाळी सणा निमीत्य उत्पादीत केलेल्या फराळ तसेच विविध वस्तूंच्या विक्री स्टॉल जिल्हा परिषदेच्या परिसरात लावण्यात आले आहे. या स्टॉलला जिल्हाधिकारी यांनी भेट देवून कौतुक केले.

जिल्हापरिषद परिसर अमरावती येथे स्वयं सहाय्यता समूहाद्वारे उत्पादित वस्तू विक्री स्टॉल चे निल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले. या प्रसंगी महानगर पालिका अयुक्त सचिन कलंत्री, सीईओ संजिता महापात्र, पोलीस अयुक्त नवीनचंद्र रेड्डी, प्रकल्प संचालक प्रिती देशमुख तसेच अधिकारी तथा जिल्हापरिषद मधील सर्व

विभाग प्रमुख उपस्थित होते. उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांचे स्वयंसहायता समुह स्थापन करण्यात येतात. ग्रामीण भागातील महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व सक्षम व्हाव्यात याकरिता महिलांना उपजिविकेची विविध साधने उपलब्ध करुन देण्यात येतात. जिल्ह्यातील महिला स्वयंसहायता समुहांव्दारे पारंपारिक पध्दतीने दिवाळी सणा निमीत्य चिवडा, लाडू, करंज्या, अनारसे, शंकरपाळे, शेव, चकली इत्यादी गावराण चव असलेले खाद्यपदार्थ बनविण्यात आले आहे. सदर खाद्यपदार्थ उत्पादक स्वयंसहायता समुहाद्वारे माफक दरात हे पदार्थ सर्वांकरिता विक्रिसाठी उपलब्ध आहेत. यासोबतच पणत्या, दिवे, आकाश कंदील तसेच दिवाळी सणा निमीत्य आवश्यक गृहउपयोगी वस्तू इतर विविध वस्तु ह्या सुध्दा विक्री साठी समुहांव्दारे उपलब्ध आहेत. यास्तव जिल्हा परिषद मधील सर्व अधिकारी कर्मचारी इतर शासकीय अधिकारी कर्मचारी तथा जिल्ह्यातील नागरिकांनी स्वयं सहाय्यता समूहाकडून वस्तू खरेदी करणे करण्याचे आवाहन यावेळी सीईओ संजिता महापात्र यांनी केले आहे

# टोमॅटो पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव झाल्यावर नियंत्रण कठीण म्हणून करा हे प्रतिबंधात्मक उपाय

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

टोमॅटो पिकांवर विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्यानंतर त्यावर नियंत्रण मिळवणे कठीण होते. परंतु, हे रोग येऊ नयेत म्हणून पूर्वनियंत्रणाचे उपाय करुन प्रादुर्भाव टाळता येऊ शकतो.

विषाणुजन्य रोगाचा प्रसार प्रामुख्याने फुलकिडे, पांढरी माशी, मावा या किडीमार्फत होतो. विषाणुंचा प्रादुर्भाव झाल्यानंतर त्यावर औषधांचा फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे किडीमार्फत होणारा प्रसार थांबविणे हाच एक उपाय आहे.

टोमॅटो पिकावरील रसशोषण करणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी आवश्यक आहे. त्यासाठी रोपवाटिकेत रोप तयार करण्यासाठी विषाणूजन्य रोगांना प्रतिकारक अशा टोमॅटोच्या वाणांची निवड करावी.शेतकऱ्यांना जर स्वत:च्या शेतात रोपे तयार करणे शक्य नसेल, तर बाहेरुन रोपे घेताना ते परवानाधारक रोपवाटिकेतूनच खरेदी करावीत तसेच त्या रोपवाटिकेला इन्सेक्ट नेट, विड मॅट, दोन दरवाजे पध्दत व रोपवाटीकेच्या नियमावली प्रमाणे असावी.

रोपे खरेदी करताना ज्या भागांमध्ये टोमॅटो पिकावर विषाणुजन्य रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे त्या ठिकाणच्या रोपवाटिकेतून रोपे खरेदी करु नयेत.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना**

१) रोपवाटीकेत बियाण्याची पेरणी झाल्यानंतर गादी वाफ्यावर ६०-१०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ मलमल कापड २ मिटर उंचीपर्यंत मच्छरदाणीसारखे गादीवाफ्यास लावावे, यामुळे रोगप्रसार करणाऱ्या किडींपासून रोपांचे संरक्षण होईल.

२) रोपवाटिकेमध्ये रसशोषक किडी (मावा, फुलकिडे, पांढरी माशी) यांचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी.




३) पुनर्लागवडीसाठी २५-३० दिवसांची रोपे पुरेसे हार्डनिंग करुन वापरावेत. पुनर्लागवडीच्यावेळी वाफ्यावर प्लॅस्टिक पेपरचे आच्छादन करावे. यामुळे पांढऱ्या माशीचे प्रमाण कमी राहते.

४) रोपाची पुनर्लागवड करण्यापूर्वी २५-३० दिवस अगोदर शेताच्या सर्व बाजूने ५-६ ओळी मका किंवा ज्वारी किंवा बाजरी अशी सापळा पिके म्हणून लावावे. त्यामुळे पांढऱ्या माशीला मोठ्या प्रमाणात अटकाव होतो.

५) रोपांची पुनर्लागवड करण्यापूर्वी इमिडॅक्लोप्रीड (१७.८ एस.एल.) ४ मिली प्रति १० लिटर पाणी या द्रावणात रोपाची मुळे १०-१५ मिनिट बुडवावी.

६) टोमॅटो पिकास शिफारशी प्रमाणे खतांच्या मात्रा द्याव्यात. तसेच नत्रयुक्त खतांचा अति वापर टाळावा.

७) टोमॅटो पिकाला आवश्यकतेप्रमाणेच पाणी द्यावे व पीक तण विरहित ठेवावे.

८) ज्या भागात/शेतात वर्षानुवर्षे तिन्ही हंगामात टोमॅटो पीक घेतले जाते अशा ठिकाणी रोग व किडी प्रस्थापित झालेले असतात त्यामुळे पीक पद्धतीतील अशी साखळी खंडीत करण्यासाठी पिकांची फेरपालट करावी.

९) रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी प्रति एकर ३०-३५ निळे व पिवळे चिकट सापळे शेतामध्ये लावावेत.

१०) टोमॅटोवरील टुटा नागअळीच्या व्यवस्थापनासाठी प्रति हेक्टरी २० कामगंध जलसापळे (वॉटर ट्रॅप) लावावेत यामुळे टूटा किडीचे सामूहिक पतंग आकर्षण व मिलन प्रजोत्पादनामधील अडथळ्यांसाठी उपयोग होऊन किडींची संख्या आणि प्रादुर्भाव कमी करता येईल.

११) टोमॅटोच्या फळांची शेवटची तोडणी झाल्यास झाडे उपटून नष्ट करावेत. रोगग्रस्त पीक शेतात तसेच राहिल्यास नवीन लागवड केलेल्या पिकांवर अशा किडींव्दारे पुन्हा प्रसार होऊन विषाणू रोगांचा प्रादुर्भाव होतो.




## पोट कमी करायचंय-जिभेवर कंट्रोल नाही? १ ग्लास पाण्यासोबत १ चमचा 'या' बिया खा, तब्येतीत दिसेल जादूई फरक

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

अनेकांना असं वाटतं की जगातलं सगळ्यात सोपं काम आहे वजन वाढवणं आणि सगळ्यात कठीण काम वजन कमी करणं. तुम्हालाही असं वाटत असेल तर गैरसमज वेळीच दूर व्हायला हवा व्यायामाबरोबरच डाएट प्लॅनवर फोकस करून तुम्ही लठ्ठपणापासून सुटका मिळवू शकता. औषधी गुणांनी परिपूर्ण अशा बियांचे सेवन करू शकता. वजन कमी करण्याव्यतिरिक्त याचे आरोग्याला इतर फायदेही मिळतील.

**फॅट बर्न करण्यास फायदेशीर**

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या रिपोर्टनुसार फ्लेक्ससिड्स वजन कमी करण्यासाठी एक चांगला पर्याय आहे. जास्त वजन आणि लठ्ठपणा कमी करण्यासाठी इच्छुक असलेल्यांसाठी हा उत्तम पर्याय आहे. अळशीच्या बियांमधील पोषक तत्व मेटाबॉलिझ्म बुस्ट करतात (ठशष). या लो कॅलरीजयुक्त बिया शरीरातील फॅट्स वेगानं बर्न करतात. म्हणूनच वाढत्या वजनावर नियंत्रण मिळवण्यासाठी तुम्ही अळशीच्या बियांना आपल्या डाएटचा एक भाग बनवू शकता. एका अभ्यासातून दिसून आले की अळशी सीआरपी आणि टिएनए-ँ यांसारखे घटक कमी करण्यासाठी महत्वपूर्ण ठरते.

वजन कमी करण्यासाठी अळशीच्या बिया पाण्यात भिजवून खाण्याच सल्ला दिला जातो. रात्री झोपण्याच्याआधी १ ग्लास पाण्यात एक चमचा अळशीच्या बीया भिजवून ठेवा. सकाळी उठल्यानंतर हे पाणी व्यवस्थित उकळवून घ्या नंतर गाळून घ्या. तुम्ही लिंबाचा रस आणि मध मिसळून याचे सेवन करू शकता.

**अळशीचे फायदे-**



अळशीच्या बिया तुमच्या गट हेल्थसाठी बऱ्याच फायदेशीर ठरतात. पोटाशी संबंधित समस्यांपासून बचाव करण्यासाठी तुम्ही अळशीच्या बियांचे सेवन करू शकता. अळशीच्या बियांमध्ये हेल्दी फॅट्स, फायबर्स, प्रोटीन्स, कॅल्शियम आणि एंटी ऑक्सिडेंट्स असतात. अळशीच्या बीया खाल्ल्यानं मेटाबॉलिझ्म वेगानं वाढतो. या भिजवल्यानंतर याचा आकारही वाढतो. ज्यामुळे बराच वेळ पोट भरलेलं राहतं.

सकाळी अळशीच्या बिया खाल्ल्यानं केसांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. कारण यात व्हिटामीन ई, ओमेगा ३ फॅटी एसिड्स, व्हिटामीन बी मोठ्या प्रमाणात असते. याशिवाय यात एंटी ऑक्सिडेंट्स आणि एंटी इंफ्लेमेटरी गुण असतात ज्यामुळे केसांशी संबंधित समस्या टाळण्यास मदत होते.

# हमीभावाने सोयाबिन खरेदी करा; शेतकरी आक्रमक

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक**

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमी भावापेक्षा अत्यंत कमी मिळणाऱ्या दरामुळे नांदगांव खंडेश्वर तालुक्यातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. त्याचा परिणाम म्हणून बुधवारी येथील सोयाबीन उत्पादकांनी कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाविरोधात आंदोलन केले. शिवणी रसुलापूर येथील शेतकरी उमेश बनसोड यांनी ११ ऑक्टोबर रोजी बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्रीस आणले होते. परंतु योग्य भाव न मिळाल्यामुळे त्यांनी बाजार समिती प्रशासनासह व सहायक निबंधक (सहकारी संस्था) यांच्याकडे रितसर तक्रार केली होती. या तक्रारीनुसार २३ ऑक्टोबरपर्यंत हमीभावाने शेतमाल खरेदीचा निर्णय न घेतल्यास २३ तारखेला तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार हे आंदोलन केले गेले. सोयाबीनमध्ये आद्रर्ता (ओलावा) अधिक असल्याचे कारण पुढे करत व्यापारी शेतकऱ्यांची प्रचंड लुट करीत आहे. एफएक्यु दर्जाच्या सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव असताना नांदगांव बाजार समितीमध्ये २००० रुपयांपर्यंत निचांकी दर दिला जात आहे.

# जिल्हा बँकेच्या उपविधीतील दुरूस्तीवर पुन्हा तारीख पुढील सुनावणी ३० ऑक्टोबरला

## प्रकाश काळबांडे यांच्या अपात्रते करीता ७ नोव्हेबरला सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती-** जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपविधीदुरुस्त्याकरीताविभागीय सहनिबंधकांनी पुन्हातारीख दिली आहे. त्यामुळे ३० ऑक्टोबरलरोजीयावर पुढील सुनावणी होणार आहे. बॅंकेचे संचालक प्रकाश काळबांडे यांच्या अपात्रतेवर देखील ७ नोव्हेंबरची तारीख देण्यात आली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या सत्ताधाऱ्यांनी बबलु देशमुख गटाच्या १३ संचालकांना विश्वासात न घेता बॅंकेच्या उपविधीत मोठ्या प्रमाणात दुरूस्त्या करण्यात आल्या आहे. त्यामुळे या विरोधात १३ संचालकांनी विभागीय सहनिबंधकांकडे ते सहकारमंत्र्यांपर्यंत तक्रारी केल्याने यावर सहकार मंत्र्यांनी स र्व दु रू स्त्या रद्दकेल्यातसेचयाचीपडताळणी करून यावर फेरसुनावणीचे विभागीय सहनिबंधकांना दिले होते. सत्ताधाऱ्यांनी मात्र सहकारमंत्र्यांच्या या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल किली.

उच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान संत्ताधारी पटाचे म्हणने विचारात न घेतल्याचा संदर्भ देत सहकार संत्र्यांचे आदेश रद्द करीत सहकामर्त्यांनीच यावर कर आदेश काढण्याबाबत निर्णय दिला. हकारमंत्यांनी मात्र यावर सुनावणी घेत त्यांचा वर्वीचाच निर्णय पुन्हा कायम करीत उपविधीतील सर्व रूस्त्या रद्द



केल्या व विभागीय सहनिबंधकांना आदेश देत यावर सुनावणी घेवुन फेरनिर्णयाच्या सुचना दिल्या आहेत. त्यामुळे विभागीय सहनिबधकांनी उपविधीतील दुरूस्तीवर आतापर्यंत ९ व १६ व २३ ऑक्टोबर रोजी सुनावणी घेतली. मात्र यामध्ये काहीच निर्णय देण्यात आला नाही.त्यामुळे पुन्हा ३० ला पुढील सुनावणी ठेवण्यात आली आहे. सोबतच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे संचालक प्रकाश काळबांडे यांच्याही अपात्रतेबाबत ७ नोव्हेंबरला ला सुनावणी होणार आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २४ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# २६ मतदारसंघांत 'शिवसेना विरुद्ध शिवसेना' सामना रंगणार!

## ठाकरे-शिंदेंकडून उमेदवारांच्या पहिल्या याद्या जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४मुंबई-** महाविकास आघाडीचा जागावाटपाचा तिढा सुटल्याचं मविआच्या प्रमुख नेत्यांनी बुधवारी (२३ ऑक्टोबर) पत्रकार परिषद घेऊन जाहीर केलं. त्याचदरम्यान, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने विधानसभा निवडणुकीतील त्यांच्या पक्षाच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पहिल्या यादीद्वारे त्यांनी ६५ उमेदवार जाहीर केले आहेत. अनेक नव्या आणि जुन्या चेहऱ्यांना यामिनित्ताने त्यांनी संधी दिली आहे. तसेच काँग्रेसच्या काही मतदारसंघांमध्ये उद्धव ठाकरेंच्या पक्षाने उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दुसऱ्या बाजूला, उद्धव ठाकरेंच्या एक दिवस आधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या शिवसेनेच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. एकनाथ शिंदे यांनी ४५ जागांवरील त्यांचे उमेदवार जाहीर केले होते. जून २०२२ मध्ये शिवसेना पक्ष फुटून दोन नवे पक्ष तयार झाले. या दोन पक्षांचा राज्याच्या राजकारणात मोठा संघर्ष चालू आहे. अशातच कोणकोणत्या मतदासंघांमध्ये शिवसेना (ठाकरे) विरुद्ध शिवसेना




(शिंदे) असा सामना रंगणार? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. आतापर्यंत दोन्ही पक्षांनी जाहीर केलेल्या उमेदवारांच्या याद्यांनुसार सध्या तरी राज्यातील २६ मतदारसंघांमध्ये हे दोन पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. यामध्ये खुद्द मुख्यमंत्र्यांचा कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघ, जोगेश्वरी पूर्व, माहिम, महाड, राधानगरीसारख्या मतदारसंघांचा समावेश आहे.दरम्यान, महायुतीच्या जागावाटपात कुडाळची जागा शिवसेनेच्या शिंदे गटाला मिळाल्यानंतर भाजपा नेते निलेश राणे यांनी शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला आहे. तब्बल दोन दशकांनंतर राणे कुटुंबातील सदस्य शिवसेनेत परतला असून निलेश राणे हे धनुष्यबाण या चिन्हावर आगामी विधानसभा निवडणूक लढवतील.दरम्यान, महायुतीच्या जागावाटपात कुडाळची जागा शिवसेनेच्या शिंदे गटाला मिळाल्यानंतर भाजपा नेते निलेश राणे यांनी शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला आहे. तब्बल दोन दशकांनंतर राणे कुटुंबातील सदस्य शिवसेनेत परतला असून निलेश राणे हे धनुष्यबाण या चिन्हावर आगामी विधानसभा निवडणूक लढवतील.

### विधानसभा निवडणुकीच्या काळात येणाऱ्या

# अमरावती विद्यापीठाच्या परीक्षा समोर ढकलल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती –** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या नियमित विषम सत्राच्या हिवाळी २०२४-परिक्षा ह्या येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान म्हणजेच ११ नोव्हेंबर २०२४ ते २१ नोव्हेंबर २०२४ होत होत्या आणि त्याच दरम्यान महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडणार आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार परीक्षा समोर ढकलण्याचे निवेदन विद्यापीठाने मान्य केले.



परिक्षेच्या काळात प्रचार रॅली, प्रचार सभा, भोंग्याच्या आवाज या सर्व गोष्टींचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर झाला असता, या सर्व गोंधळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता होती. त्याचप्रमाणे एल एल बी दुसऱ्या सत्राचा निकाल उशिरा लागल्याने नियमित विद्यार्थ्यांचे व कॅरी ऑन विद्यार्थ्यांचे प्रवेश उशिरा झाले आणि त्यात अभ्यासक्रमात बदल झाल्याचे परिपत्रक जाहीर केले तोपर्यंत विद्यार्थ्यांनी कोणता अभ्यास करायचा हे विद्यापीठाने अधिकृतरीत्या जाहीर केले नव्हते त्यामुळे त्या परिपत्रकापासुन शासकीय सुट्या वगळता फक्त ३३ दिवसाचा कालावधी विद्यार्थ्यांना मिळत आहे जो की खूप कमी प्रमाणात आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षात घेऊन विद्यापीठाचे कुलगुरू तसेच डॉ. नितीन कोळी,संचालक परिक्षा विभाग यांनी विद्यार्थ्यांच्या निवेदनाची दखल घेत डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात म्हणजेच २७ डिसेंबर २०२४ ते ६ जानेवारी २०२५ दरम्यान परिक्षा घेण्याची मागणी मान्य केली व तसा सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना पाठवण्यात आला, त्यामुळे विधी शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांना(तिसरे सत्र, पाचवे सत्र, सातवे सत्र) यांना दिलासा मिळाला आणि परिक्षेची तयारी करण्यासाठी योग्य प्रमाणात वेळ मिळाला.

# 'स्वीप' उपक्रमांतर्गत ओपीडीच्या चिठ्ठीवर आता मारण्यात येणार 'मी मतदान करणार' चा शिक्का

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**



मतदार जनजागृतीसाठी जिल्हाभर विविध उपक्रम राबवणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांतील बाह्य रुग्ण विभागाच्या (ओपीडी) चिठ्ठींवर 'मी मतदान करणार' असा शिक्का मारणार आहे. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठीच्या 'स्वीप' उपक्रमाच्या नोडल अधिकारी, जि. प.च्या सीईओ संजीता महापात्र यांनी बुधवारी माध्यमांशी संवाद साधला.

'स्वीप' कार्यालयाच्या उद्घाटनानंतर माध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, लोकसभा निवडणुकीच्या वेळीही जि.प. आणि मनपाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवला होता.

त्याचे दृश्य परिणाम म्हणून मतदानाच्या टक्केवारीत गेल्यावेळच्या तुलनेत तीनने वाढ झाली. त्यामुळे यावेळीही मानवी साखळी, मतदार जनजागृती मेळावे, पथनाट्य, रॅली, म्बेसॅडरच्या उपस्थितीत संवाद कार्यशाळा आदी उपक्रमांतून मतदानाप्रती जागरुकता निर्माण केली जाणार आहे.

त्यांच्यामते मतदानाचा टक्का वाढवणे ही शासकीय कार्यालयांची सामुहिक जबाबदारी आहे. त्यामुळे विद्यापीठ, निवडक महाविद्यालये, अशासकीय संस्था, सेवाभावी व स्वयंसेवी संस्था, विशेषकरुन नागरिकांना या उपक्रमांत सामावून घेतले जाईल. मुळात गेल्यावेळी ज्या भागात कमी मतदान झाले, तिथे लक्ष केंद्रीत करुन तेथे 'स्वीप'चे उपक्रम राबवणार आहेत.

### राज्यस्तरीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धा सन २०२४-२५

# खेळाडूंनी खेळाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधावा- जिल्हाधिकारी सौरभ कटियार




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती, –** राज्यस्तरीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धेचे आयोजन उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती विभाग, अमरावती तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद तसेच महाराष्ट्र म्यिच्युअर नेटबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने विभागीय क्रीडा संकुल येथे सुरु असून २४ ऑक्टोबर २०२४ पर्यंत चालणार आहे.

या स्पर्धेचा उद्घाटन जिल्हा क्रीडा परिषद अध्यक्ष तथा, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे, क्रीडा व युवक सेवा उपसंचालक विजय संतान, सहसचिव श्याम देशमुख, महाराष्ट्र म्यिच्युअर नेटबॉल असोसिएशन उदय ठाकरे, जिल्हा नेटबॉल असोशिएशन अध्यक्ष डॉ. सुगन बंड, अमरावती जिल्हा नेटबॉल असोसिएशन उपाध्यक्ष सुनिल कडू, अमरावती जिल्हा नेटबॉल असोसिएशन सचिव आदी यावेळी उपस्थित होते.

खेळाडूंनी अथक परिश्रम घेऊन राष्ट्रीय स्तरावर राज्याला नेटबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवून द्यावे. तसेच खेळाडूंनी खेळाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधावा. समाजात जनजागृती करण्यासाठी धर्म, वंश, जात, भाषेच्या पुढे जाऊन जनसामान्याला मतदानासाठी प्रोत्साहित व प्रेरित करावे. देशाच्या व राज्याच्या लोकशाहीचे परंपरेचे जतन करण्याचे कार्य युवा वर्ग व खेळाडूंनी करावे, असा संदेश जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दिला.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी जिल्ह्यातील राष्ट्रीय खेळाडूंनी क्रीडा ज्योत जिल्हाधिकारी श्री. कटियार व उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन केले. याप्रसंगी खेळाडूंनी शपथ सोहळा सोबतच राष्ट्रीय मतदार जनजागृती करण्यासाठी मतदारांसाठीची प्रतिज्ञा सर्व खेळाडू, अतिथी, प्रशिक्षक, पालक, क्रीडा प्रेमी यांनी घेतली.

राज्यस्तरीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धेचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा धोरणानुसार खेळाडूला ५ टक्के आरक्षणांतर्गत अमरावती शहरातील नेटबॉलचे राष्ट्रीय , खेळाडू ज्याची निवड पोलीस दलात झाली अशा अनुज तांमटे, सागर कुरळकर, सुमेरसिंग भिसेन यांचा यशोचित गौरव करण्यात आला. तसेच सत्र २०२४-२५ या वर्षातील नुकत्याच नांदेड येथे संपन्न झालेत्या राज्यस्तरीय शालेय धनुविद्या स्पर्धेत अमरावती येथील जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील धनुविद्या खेळाडूंनी जिल्ह्याचा लौकिक मिळवून दिला. तसेच नाडीचाड, गुजरात येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय धनुविद्या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या संघात रिकर्व्ह गटात १७ वर्ष वयोगट मध्ये कुमकुम मोहोड, १४ वर्ष वयोगटात सार्थक डांगे, वेदांत वानखडे तसेच इंडियन प्रकारात १४ वर्ष वयोगटातील अथर्व भोपटे, रोहन देवाडेकर, तनिष्क आखरे या खेळाडूंची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार व शुभेच्छा जिल्हाधिकारी व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला.

या उद्घाटन सोहळ्यास राज्यातील ८ विभागातून आलेल्या १४ व १९ वर्ष वयोगटातील मुले व मुली खेळाडू संघ व्यवस्थापक, क्रीडा मार्गदर्शक व राज्य व जिल्हा संघटनेचे पदाधिकारी, क्रीडा रसिक प्रेक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. संतान यांनी केले.-

# ३० नोव्हेंबर आणि १ डिसेंबर रोजी विशेष लोक अदालत




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती** अमरावती, अमरावतीसह राज्यातील सर्व न्यायालयात दि. ३० नोव्हेंबर आणि दि. १ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.लोकअदालतीमध्ये दाखल आणि दाखलपूर्व अशी प्रकरणे तडजोडीने आणि सामंजस्याने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येते. नागरिक, तसेच पक्षकारांनी राष्ट्रीय लोकअदालती समक्ष आपली प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने मिटवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर वें. यार्लगड्डा यांनी केले आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या सूचनेनुसार विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष लोक अदालतीत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. नागरिक तसेच पक्षकारांनी तडजोड प्राप्त प्रलंबित खटले राष्ट्रीय लोक अदालत समक्ष तडजोडीने व सामंजस्याने मिटविण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा. तसेच दाखलपूर्व प्रकरणांबाबत नजिकच्या जिल्हा किंवा तालुका न्यायालयाशी संपर्क साधावा लागणार आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव मंगला कांबळे यांनी दिली आहे.

# नितीन कदम उमेदवारी अर्ज सोमवारी दाखल करणार !

## रॅलीसह संकल्प शेतकरी संघटनेचे शक्तिप्रदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती,** विधानसभेच्या बडनेरा मतदारसंघात संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम २८ ऑक्टोबरला त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यानिमित्त रॅलीसह संकल्प शेतकरी संघटनेतर्फे शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी बडनेरा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा संकल्प त्यांच्या वाढदिवशी जाहीर केला होता. तेव्हापासून ते कामाला लागलेले आहेत. आता त्यांनी २८ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासोबतच



प्रचाराचा नारळ फोडणार आहे. येत्या २८ ऑक्टोबरला दुपारी १२ वाजता नितीन कदम त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

याकरिता संकल्प शेतकरी संघटना व नितीन कदम यांच्याकडून बडनेरा येथील प्रचार कार्यालयापासून डॉ. बाबसाहेब आंबेडकर व छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा पुतळा, बडनेरा ते साईनगर- नवाथे- राजापेठ- राजकमल चौक दसरा मैदान तहसील कार्यालय या मार्गाने त्यांच्या नामांकन रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीच्या माध्यमातून नितीन कदम शक्तिप्रदर्शन करणार आहे. या करिता नितीन कदम यांनी या रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# खर्च निरीक्षकांशी संपर्क साधण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती, –** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी दोन खर्च निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. खर्च निरीक्षक व्येंकन्ना तेजावथ आणि श्रीमती उमा माहेश्वरी यांची जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीतील खर्चावर देखरेख राहणार आहेत. निवडणूक खर्चाबाबत तक्रारी, समस्या असल्यास खर्च निरीक्षकांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. खर्च निरीक्षक व्येंकन्ना तेजावथ यांच्याकडे ३६ – धामणगाव रेल्वे, ३७ – बडनेरा,



३८- अमरावती, ३९ – तिवसा आणि श्रीमती उमा माहेश्वरी यांच्याकडे ४० – दर्यापूर, ४१ – मेळघाट, ४२ – अचलपूर, ४३ – मोर्शी या मतदारसंघातील खर्च निरीक्षकाची जबाबदारी सोपविली आहे.

खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावथ यांच्या कार्यालयाचा पत्ता चंद्रभागा, शासकीय विश्रामगृह, कॅम्प, अमरावती असून ई-मेल शुलिी३६ी३९रलसारळश्र.लो, कार्यालयाचा संपर्क क्रमांक –०७२१ – २९५१९११, मोबाईल क्रमांक – ७६६६२४३४६८ असा आहे.

खर्च निरीक्षक डॉ. उमा माहेश्वरी यांच्या कार्यालयाचा पत्ता शहानूर, शासकीय विश्रामगृह, कॅम्प, अमरावती असून ई-मेल शुलिी४०ी४३रलसारळश्र.लो, कार्यालयाचा संपर्क क्रमांक – ०७२१- २९५१९१०, मोबाईल क्रमांक ७६६६७९१११४ असा आहे.

# नंदुरबारमध्येही होणार सांगली पॅटर्न

## काँग्रेसचे पदाधिकारी करणार बंडखोरी, उमेवारीवरून नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४नंदुरबार –** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारी घोषित करण्यात येत आहे. यासोबतच पक्षातच अंतर्गत नाराजी पाहण्यास मिळत आहे. तर काही ठिकाणी ठोस भूमिका घेत पक्षाकडून जाहीर करण्यात आलेल्या उमेदवाराला विरोध करत पक्षातीलच पदाधिकारी बंडखोरी करण्याच्या तयारीत आहेत. असेच चित्र नंदुरबारच्या शहादा- तळोदा मतदारसंघात पाहण्यास मिळत आहे.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. महायुती, महाविकास आघाडीकडून उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. परंतु बाहेरून आलेल्यांना उमेदवारी घोषित केल्यामुळे नाराजीनाट्य देखील उफाळून येत आहे. त्यानुसार काँग्रेसची विधानसभा निवडणूक उमेदवारांचे यादी जाहीर होण्यापूर्वी शहादा- तळोदा विधानसभा मतदारसंघात तीव्र नाराजी उमटत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपचा प्रचार करणाऱ्या प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र गावित यांना उमेदवारी मिळत असल्याची चर्चा असल्याने काँग्रेसमधील पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# नागपुरात आठ लाखांची रक्कम जप्त, आचारसंहिता काळातील पहिली कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर** :- विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरु असल्याने पोलीस विभागाच्या विशेष पथकांची पैशांचा गैव्यवहार आणि हवाला रक्कम यावर करडी नजर आहे. उमेश ऐदबान याचे मानेवाडा रोडवर चहाचे दुकान आहे. तो सायंकाळी महाराज बाग चौकाकडून विद्यापीठ वाचनालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलावर दुचाकी घेऊन उभा होता. तो बराच वेळ तेथे कुणाचीतरी वाट बघत असल्याचे दिसत होते. सीताबर्डी पोलिसांचे एक पथक त्या रस्त्यावरुन गस्त घालत होते. त्यावेळी उमेश हा त्यांना दिसला.

त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्यामुळे पोलिसांनी त्याला थांबण्याचा इशारा केला. मात्र, पोलीस जवळ येत असल्याचे बघून उमेश पळायला लागला. त्यामुळे पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन पकडले. त्याच्या दुचाकीच्या डिक्की उघडायला सांगितले असता तो टाळाटाळ करीत होता. मात्र, पोलिसांनी त्याच्या हातून दुचाकीची चाबी घेऊन डिक्की उघडली असता त्यात ५०० रुपयांच्या नोटांचे काही बंडल दिसले.पोलिसांनी लगेच नियंत्रण कक्षाला माहिती दिली. तसेच पोलीस उपायुक्त राहुल मदने आणि ठाणेदार चंद्रशेखर चकाटे यांच्यासमोर आरोपी उमेशला हजर केले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला



आहे. नुकताच पुण्यातील खेड शिवापूर टोलनाका परिसरात नाकाबंदीत एका कारमधून पाच कोटी रुपयांची रक्कम पोलिसांनी जप्त केली होती. ती रक्कम एका आमदाराची असल्याचा आरोप करण्यात येत आहे. ती रक्कम निवडणुकीदरम्यान खर्च करण्यासाठी पाठविण्यात आल्याचा आरोपही काही नेत्यांनी केला होता. या प्रकरणात निवडणूक आयोग, प्राप्तीकर विभाग, पोलीस विभाग तपास करीत आहे. त्या अनुषंघाने नागपुरातही सापडलेली रक्कम कुण्या राजकीय नेत्याशी संबंधित आहे का? याबाबत सीताबर्डी पोलीस तपास करीत आहेत. सीताबर्डी पोलिसांनी बुधवारी सायंकाळी एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेऊन आठ लाख रुपयांची रक्कम जप्त केली. ती रक्कम हवाल्याची असल्याची प्राथमिक माहिती आहे. उमेश रामसिंग ऐदबान (५०, रा.मानेवाडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीच नाव आहे. जप्त केलेली रक्कम निवडणूक विभागाकडे दिली जाईल, अशी माहिती सीताबर्डी पोलिसांनी दिली.उमेशकडून आठ लाखांची रक्कम पोलिसांनी जप्त केली. आचारसंहिता लागल्यानंतर एवढी मोठी रक्कम जप्त केल्याची पहिलीच घटना आहे. जप्त केलेल्या रकमेबाबत पोलिसांनी विचारणा केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. या प्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी एका आरोपी उमेशवर गुन्हा दाखल केला आहे. जप्त केलेली रक्कम निवडणूक निर्णय अधिकारी (पश्चिम विधानसभा मतदार संघ) यांना पुढील कारवाईकरिता माहिती देण्यात आली.

# साहेबांवर विश्वास, त्यांच्या शब्दा पलिकडे नाही

## शिवसेना नेत्या प्रिती बंड यांची भूमिकाशिवसेना उबाठा उमेदवारी जाहिर झाल्यानंतर समर्थकांची नाराजी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**
वरीष्ठांच्या आदेशानेच मी कामाला लागले होते. गेल्या तीन वर्षापासून सतत पक्षासाठी काम करीत आहे. माझा साहेबांवर पूर्णविश्वास आहे, आणित्यांना माझे काम कसे आहे, मी काय केले, हे सर्वांना आणि साहेबांनासुद्धा माहित आहे. पण, ऐन शेवटच्या क्षणी हे कसे काय झाले? हा मलाच प्रश्न पडला. मीविचारात पडले, अ श ी प्रतिक्रियाशिवसेनानेत्याप्रिती बंड यांनी व्यक्त केली. तिकिट नाकारल्यावर पुढे काय? असा प्रश्न केला असता, मी साहेबांच्या शब्दा पलिकडे नाही, आणि पुढेही जाणार नाही, असे उत्तरत्यांनी दिले.

बुधवारला सायंकाळी शिवसेना (उबाठा) बडनेरा मतदार संघाची उमेदवारी सुनिल खराटे यांना जाहिर होताच दुसऱ्या दावेदार प्रिती बंड यांच्या समर्थकांमध्ये नाराजी पसरली आणि त्यांनी बंड यांच्या रुख्मिनी नगर निवासस्थानी धाव घेतली. यावेळी उपस्थित प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधींनी त्यांना विचारणा केली असता त्या म्हणाल्या की, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मला ७५ हजार मते मिळाली होती. गेल्या तीन वर्षापासून मी पक्षासाठी काम करीत आहे. पण, आता स्वतःच खुप विचारात पडले की, हे झालेचकसे? माझा – साहेबांवर पूर्ण विश्वास आहे, आणि – राहिल. पण मला स्वतःलाच कळायला – मार्ग नाही.गेल्या ४०–४५ वर्षापासून बंड परीवार शिवसेनेसोबत जुळलेला आहे. प्रामाणिक पणे आणि निष्ठेने काम केले आणि निष्ठा जोपासली आहे, पण माझे चुकले कुठे? हे समजायला मार्ग नाही. कारण गेल्या अनेक दिवसांपासून आम्ही मेहनत करीत आहोत. आमचे काही सहकारी म्हणायचे पैसे कुठून आणणार, तर तर त्यांनीच पैसे जमा करणे सुद्धा सुरु केले होते. वरीष्ठांनीच सल्ला दिल्याने आम्ही जोमाने कामाला लागलो. पदयात्रा काढल्या, मेळावे घेतले, प्रत्येक गोष्टीची पूर्ण तयारी आम्ही केली होती, असे त य ा म्हणाल्या.बाईटशिवसेनेतील एक विरोध गट कायम सक्रिय होता, काहीं मिस फिडींग केले काय? असा प्रश्न केला असता त्या म्हणाल्या की, त्यांचे समिकरण काय होते, ते माहिती नाही. पण, मिस फिडींगचा विषय नाही. मी काय केले, हे सर्वांना माहिती आहे. माझे काम पारदर्शक आहे. साहेबांना सुद्धा मी काय आहे, हे माहित आहे. पण, पुन्हा एकदा सांगते, मी साहेबांच्या शब्दापलिकडे जाणार नाही, अशा शब्दात प्रिती बंड यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांच्या समर्थकांनी जोरदार नारेबाजी केली.आता ही नाराजी सुनील खराटे कशी दूर करतात या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# यजमान अमरावती संघासह नागपूर आणि पुणे विद्यापीठाची आगेकूच

## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती** – स्थानिक शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेत स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी यजमान अमरावती सह नागपुर आणि पुणे विद्यापीठ संघाने दमदार कामगिरीच्या भरोशावर आपल्या संघाला पुढील फेरीत प्रवेश मिळून दिला. उद्यापासून मागच्या वर्षी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झालेले भारतीय विद्यापीठ पुणे, कोटा विद्यापीठ कोटा, मुंबई विद्यापीठ मुंबई आणि एस आर टी एम विद्यापीठ नांदेड हे संघ स्पर्धेत सहभागी होणार असल्यामुळे या स्पर्धा चांगल्या चुरशीच्या होणार आहे.प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात यजमान संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संघाने चारोत्तर विद्यापीठ गुजरात या संघाचा ५१ विरुद्ध १० असा तब्बल ४१ गुणांनी पराभव करत दमदारपणे पुढील फेरीत प्रवेश केला. अमरावती विद्यापीठ संघातर्फे मंजुळा पवार, अक्षदा धानोरकर आणि पायल या खेळाडूंनी उत्कृष्ट चढाई करत आपल्या संघाला नेत्र दीपक यश प्राप्त करून दिले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाने चुरशीच्या लढतीत देवी अहिल्याबाई विद्यापीठ इंदोर या संघाचा ४३ विरुद्ध ३२ असा ११ गुणांनी पराभव केला. नागपूर विद्यापीठातर्फे साक्षी त्रिवेदी, श्वेता रत्नपारखी आणि प्रांजल या खेळाडूंची खेळी सर्वोत्तम ठरली. मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठ संघाने शिखरच्या पीडीयूसी विद्यापीठाचा ३९ विरुद्ध २९ असा दहा गुणांनी पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला. मुंबई संघातर्फे हर्षदा खोत आणि ज्योती धाकडे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. एकतर्फी झालेल्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गोविंद गुरु ट्रायबल विद्यापीठ बंदसारा विद्यापीठाचा ४८ विरुद्ध २ असा तब्बल ४६ गुणांनी पराभव केला. पुणे विद्यापीठ संघातर्फे स्नेहा पावरा अपर्णा मुरकुटे आणि पूजा क्रमावत यांची खेळी प्रशंसनीय अशी ठरली.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ संभाजीनगर या संघाला स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी पराभवाचा सामना करावा



लागला. या संघाला जे पी जे टी विद्यापीठ झणझुणू या संघाने ३२ विरुद्ध २३ असा ९ गुणांनी प्रभाव केला. अत्यंत चुरशीची आढळलेल्या नॉर्थ गुजरात विद्यापीठ पाटण या संघाने अवधी प्रताप सिंग विद्यापीठ रेवा या संघाचा २७ विरुद्ध २५ असा २ गुणांनी प्रवाह केला. शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्यात पाटण विद्यापीठात तर्फे निर्मल आणि प्रतीक्षा या खेळाडूंनी आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात भरीव असे योगदान दिले. मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ १३ गुणांनी बरोबरीत होते. त्याचप्रमाणे अन्य सामन्यात राजस्थान विद्यापीठ संघाने राणी दुर्गावती विद्यापीठ जबलपूर या संघाचा ३० विरुद्ध २१ असा ९ गुणांनी प्रभाव केला. विजयी संघातर्फे अनिता सैनि आणि कामीका शर्मा यांनी या सामन्यात भरीव असे योगदान दिले. महाराजा गंगा सिंग विद्यापीठ बिकानेर या संघाने कवियत्री नॉर्थ विद्यापीठ जळगाव या संघाचा ४८ विरुद्ध १० असा ३८ गुणांनी प्रभाव केला. गुजरात विद्यापीठ नवरंगपुरा अहमदाबाद या संघाने बंसली विद्यापीठ राजस्थान या संघाचा ४३ विरुद्ध १७ असा २३ गुणांनी एकतर्फी पराभव केला. महर्षी दयानंद विद्यापीठ अजमेर संघाने मन्सूर फिजिकल एज्युकेशन विद्यापीठ मन्सूर या संघाचा ४० विरुद्ध ७ असा ३३ गुणांनी फडशा पडला. विवेकानंद ग्लोबल विद्यापीठ जयपूर संघाने महाराजा बुंदेलखंड विद्यापीठ छत्रपूर या संघाचा ५५ विरुद्ध ७ असा पराभव केला.आज झालेल्या स्पर्धेचे निकाल खालील प्रमाणे आहे. महाराजा सयाजी विद्यापीठ बडोदा मात राजस्थान विद्यापीठ जयपूर १५ विरुद्ध ७. राजा शंकर शहा विद्यापीठ शिंदवाडा मात सौराष्ट्र विद्यापीठ राजकोट ४९ विरुद्ध २१. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा मात जय नारायण व्यास विद्यापीठ जोधपुर ४२ विरुद्ध २०. राणी दुर्गावती जबलपूर विद्यापीठ मात मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ उदयपूर ३६ विरुद्ध १६. जे पी जे टी विद्यापीठ झुनझुन राजस्थान गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली ५१ विरुद्ध २१. महाराजा गंगा सिंग विद्यापीठ बिकानेर मात महाराजा भावनगर विद्यापीठ भावनगर ३७ विरुद्ध ७. देवी अहिल्या विद्यापीठ इंदोर मात खुशालदास विद्यापीठ हनुमानगड ४३ विरुद्ध ३२. महर्षी दयानंद विद्यापीठ अजमेर मात डॉक्टर सुभाष विद्यापीठ जुनागड ५२ विरुद्ध ७.उद्या या स्पर्धेचा तिसरा दिवस राहणार असून उद्या आणखी चुरशीच्या सामन्याचा आनंद प्रेक्षकांना घेता येणार आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी स्पर्धा संयोजक डॉक्टर सुभाष गावंडे यांच्या मार्गदर्शनात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक हे परिश्रम घेत आहेत.

# धामणगाव रेल्वेत ३.१७ लाख मतदारांसाठी ३७८ मतदान केंद्र

## उपविभागीय महसूल अधिकारी तेजश्री कोरे यांनी दिली माहिती




**कटियार यांची चांदूर रेल्वेला भेट**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मंगळवारी चांदूर रेल्वेला भेट दिली. यावेळी स्ट्राँग रूम असलेल्या आयटीआय येथे भेट देऊन पाहणी केली. यानंतर एसडीओ कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली व निवडणुकीच्या तयारीविषयी माहिती जाणून घेतली.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ चांदुर रेल्वे** – धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर या तीन तालुक्यांचा समावेश असून, ३७८ मतदान केंद्र आहेत. या केंद्रांवर ३ लाख १७ हजार २९४ मतदारांसाठी व्यवस्था करण्यात आल्याचे चांदूर रेल्वेच्या एसडीओ तेजश्री कोरे यांनी सांगितले.

विधानसभा निवडणूक २०२४ च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने चांदूर रेल्वेच्या उपविभागीय अधिकारी (एसडीओ) तेजश्री कोरे यांनी मतदारसंघाच्या तयारीचा अहवाल सादर केला. या वेळी बोलताना त्या म्हणाल्या, या मतदारसंघात १ लाख ६० हजार १९८ पुरुष व १ लाख ५७ हजार ९४ महिला, दोन तृतीयपंथी मतदार आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने तालुका निहाय प्रत्येकी १ एफएसटी पथक नियुक्त केले आहे. ३ एसएसटी चे पथक तयार करण्यात आले आहे. याशिवाय ४ व्हीएसटी पथक व १ व्ही.व्ही.टी. पथक तयार करण्यात आले आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर २४ तास, ४८ तास व ७२ तासात करावयाची कार्यवाही संबंधित यंत्रणेमार्फत पुर्ण करण्यात आलेली आहे. आयटीआयची इमारत स्ट्राँग रुम करीता घेण्यात आली आहे. एसडीओ कार्यालयात एक खिडकी कक्ष सुरु करण्यात आला असून सदर कक्षामार्फत उमेदवारांना आवश्यक असलेल्या सर्व परवानगी तात्काळ देण्याकरिता पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद विभाग, महसूल विभागातील नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारसंघात ३३ झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांच्या मार्फत मतदार संघांतर्गत अंपग, वयोवृध्द मतदारांना घरी मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. २६ ऑक्टोंबर व २७ ऑक्टोंबर रोजी मतदान पथक यांचे पहिले प्रशिक्षण आयोजीत करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी चांदुर रेल्वेच्या तहसीलदार पूजा माटोडे, धामणगाव रेल्वेचे तहसिलदार अभय घोरपडे व नांदगाव खंडेश्वरच्या तहसिलदार अश्विनी जाधव यांची उपस्थिती होती.

# दुचाकीची समोरासमोर धडक

## वरुड तालुक्यातील शेतकऱ्यासह दोघांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ वरुड–** भरधाव व अनियंत्रीत दुचाकीची समोरासमोर धडक होवून झालेल्या अपघातात दोन्ही दुचाकीस्वार ठार झाले. राष्ट्रीय महामार्गावरील माणिकपुर फाट्याजवळ सायंकाळच्या सुमारास हा अपघात झाला. मृतांची नावे पुरुषोत्तम बासकवरे व जगन ठेपे अशी आहेत.

वरुड तालुक्यातील गोरेगाव येथील पुरुषोत्तम भीमराव बासकवरे (५५) हे एम.एच.२७ बीएच २७२१ क्रमांकाच्या दुचाकीने बेनोड्यावरुन गोरेगाव येथे जात होते. त्याचवेळी विरुद्ध दिशेने शेतातून विद्युत पंप बंद करुन जगन ठेपे (५२) हे एम.एच.२७ बीएक्स ३७६८ क्रमांकाच्या दुचाकीने नागझीरीवरून बेनोडा शहीदकडे येत होते. माणिकपूर फाट्यानजीक दोन्ही दुचाकींची



समोरासमोर धडक झाली. या धडकेत दोन्ही दुचाकीचालक घटनास्थळीच मृत्यूमुखी पडले.

अपघात झाल्याचे कळताच रस्त्याने ये–जा करणारे नागरिक तसेच बेनोडा, गोरेगाव, नागझिरी व माणिकपूर येथील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. त्यातील एकाचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आल्याने अपघातानंतर नेमके काय घडले, याबाबत वेगवेगळे तर्क–वितर्क काढले जात आहे.

अपघात घडताच बेनोडा (शहीद) पोलिसांनी घटनास्थळ गाठून दोन्ही मृतदेह ग्रामीण रुग्णालयात रवाना केले तर अपघातग्रस्त दुचाकी पोलिस स्टेशन परिसरामध्ये आणून घटनास्थळाचा पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशनचे ठाणेदार ज्ञानोबा फड यांचे मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# अमरावती मधून मनसे ची पपु पाटील यांना उमेदवारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती** – राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाकडून विधानसभा निवडणुकीसाठी तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. तिसऱ्या यादीत मनसेनं १३ जागांवरील उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे.यामध्ये अमरावती विधानसभा मतदार संघातून पपु पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली पपु पाटील यांना उमेदवारी जाहीर होताच मनसे कार्यकर्त्यांनी फटाखे व मिठाई वाटत जल्लोष साजरा केला आता अमरावती विधानसभा मतदार संघाचे चित्र जवळपास स्पस्ट झाले असून तिरंगी लढत या मतदार संघात होणार आहेमहाविकास आघाडी,महायुती व मनसे या तीन प्रमुख पक्षाचे नेते निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत

# कॅप्टन अभिजीत अडसूळ यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज....



दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना-भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार कॅप्टन अभिजीत आनंदराव अडसूळ यांनी दर्यापूर तहसील येथे आज आपल्या समर्थकांसह उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी सम्पूर्ण वातावरण भगवामय झाले होते.

## महाराष्ट्र निवडणुकीत संघानं बनवली रणनीती; कोणकोणत्या मुद्द्यांवर करणार प्रचार?

### ३६ संघटना होणार प्रचारात सक्रीय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**

लोकसभा निवडणुकीत बसलेल्या फटक्यातून धडा घेत भाजपाने विधानसभा निवडणुकीची तयारी केली आहे. त्यासाठी आधीपासून संघासोबत समन्वय साधण्यासाठी नागपूरात विविध बैठका घेण्यात आल्या. आता भाजपाच्या विजयासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्याशी निगडीत ३६ संघटना प्रचारात सक्रीय होणार आहेत. त्यात लहान लहान गट बनवून लोकांच्या घरोघरी जाण्यावर भर दिला जाणार आहे. त्यात संघ विचारसरणीचे लोक लोकांना भाजपा नेतृत्वातील महायुतीसाठी मतदान करण्यासाठी आग्रह करणार आहेत.



संघाच्या कार्यकर्त्यांकडून जनमत तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात संपर्क अभियान मोहिम सुरू करण्यासाठी काम करण्यात येत आहे. संघाने त्यासाठी त्यांच्या सहकारी संघटना आणि त्यांच्या समन्वयकांशी चर्चा सुरू केली आहे. संघाचे सहकारी संघटना विविधरित्या महाराष्ट्रात महायुतीच्या विजयासाठी प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्रातील विविध भागांत त्यासाठी बैठका, सभांचे आयोजन केले आहे. ७-८ जणांचा गट बनवून लोकांच्या घराघरापर्यंत पोहचण्यात येईल. त्यात राष्ट्रीय हित, हिंदुत्व, सुशासन, विकास आणि लोककल्याणकारी योजना यासह विविध मुद्दे पटवून देत त्यावर चर्चा करत लोकांचं मतपरिवर्तन करण्यासाठी काम केले जाणार आहे.

## जिल्हा नियोजनचे १८९ कोटी रुपये खर्च

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती :**

जिल्हा नियोजन समितीत सर्वसाधारण योजनांसाठी २२५ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असताना प्रत्यक्षात यंत्रणांकडून १८९ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता मंगळवारी लागली आहे. त्यामुळे पुढील दीड ते दोन महिने विकासकामे ठप्प पडणार आहेत.

जिल्ह्यासाठी ४४७ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर केला आहे. त्यानुसार आतापर्यंत जवळपास २२५ कोटींच्या विविध कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शासनाने जिल्ह्यासाठी १८९ कोटी रुपयांचा निधी पहिल्या टप्यात उपलब्ध करून दिला आहे. अशातच आता विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर केलेलीकामे तातडीने मार्गी लावण्यासाठी जिल्हा नियोजन विभागासह प्रशासनाची धावपळ सुरू आहे. त्यानुसार विविध यंत्रणांना वेळेत प्रस्ताव सादर करताना प्रशासकीय नाही. चार महिने या मान्यता घेण्याची लगीनघाई सुरू होती. असे असताना आगामी निवडणुकीची आचारसंहिता लक्षात घेता, प्रशासकीय मान्यता व निधी विनियोगाची कामे मार्गी लावण्याचे आव्हान असून, विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी कामे मार्गी लावण्यासाठी कसरत सुरू होती तरीही आचारसंहितेमुळे अनेक 'विकासकामे अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर नव्या कामांना मंजुरी देता आली नाही. त्यामुळे आता ही कामे विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर सुरू होणार आहे.

## थंडीची चाहूल : राज्यात दिवाळीपासून थंडीची तीव्रता वाढणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

नैऋत्य मोसमी पावसाने राज्यातून माघार घेतली असली तरीही पावसाचे वातावरण कायम आहे. मान्सून परतताच राज्यात अवकाळी पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे थंडीसाठी आणखी किती प्रतीक्षा करावी लागेल, हाच प्रश्न प्रत्येकाच्या मनात होता. यावर्षी ऑक्टोबर हिट ने सर्वांनाच त्रस्त केले. अजूनही उकाडा पूर्णपणे गेलेला नाही. सायंकाळपासून पहाटेपर्यंतच थंड वाऱ्याची हलकी झुळूक जाणवते. दिवसा मात्र अजूनही उकाडाच आहे. त्यामुळे सारेच थंडीच्या प्रतीक्षेत आहेत.



अधूनमधून डोकावणारा अवकाळी पाऊस देखील राज्यातून लवकरच विश्रांती घेईल. त्यामुळे येत्या काही दिवसात राज्यात पावसाचा जोर ओसरणार असल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले. दोन दिवसांपूर्वी तापमानात घट झाली होती, पण आता पुन्हा तापमान वाढताना दिसून येत आहे. रात्रीपासून पहाटेपर्यंत थंडी आणि दिवसा उन्ह अशीच स्थिती राज्यात सर्वत्र आहे. एरवी दिवाळीची चाहूल लागली, म्हणजेच दसऱ्याच्या सुमारास थंडीची जाणीव व्हायची. यावेळी दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आली तरी म्हणावा तसा थंडीचा पत्ता नाही.सध्याच्या अंदाजानुसार ऑक्टोबर अखेर पाऊस थांबून थंडीला सुरुवात होईल. दरम्यान, २६ ते २९ दरम्यान फक्त दक्षिण महाराष्ट्रात चार दिवस किरकोळ पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या चार दिवसात अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, हिंगोली, नांदेड, परभणी तसेच विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर अशा १८ जिल्ह्यात ढगाळ वातावरण राहिल. तर काही ठिकाणी मध्यम ते हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. उत्तर कोकणात आज वातावरण कोरडे राहील, तर दक्षिण कोकणात पावसाच्या तुरळक सरी कोसळतील. त्यानंतर पाऊस विश्रांती घेईल.

भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार गुरुवारपासून म्हणजेच आजपासून राज्यात पावसाची उघडीप मिळू शकते. त्यामुळे राज्यात एक नोव्हेंबरपासून खऱ्या अर्थाने थंडीला सुरुवात होईल. या आठवड्याच्या अखेरीस नाशिक, जालना, संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, अमरावती, अकोला या भागात थंडीला सुरुवात होईल. सध्यातरी नागरिकांना रात्री पडणाऱ्या हलक्या थंडीवर समाधान मानावे लागत आहे. सायंकाळी वाहनांवरून जाताना थंड वाऱ्याची झुळूक जाणवते. तेच घरी आल्यानंतर मात्र उकाडा जाणवतो. एरवी नागपूर शहर देखील लवकर थंड व्हायचे. मात्र, विकासकामांमुळे या शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली. सगळीकडे सिमेंट रस्ते आणि बांधकाम सुरू असल्याने हे शहर देखील आता लवकर थंड होत नाही.

## 'दाना' चक्रीवादळाचा रेल्वेला फटका; ऐन सणासुदीत प्रवासी गाड्या रद्द

### भुसावळ विभागातून धावणाऱ्या गाड्यांवर चक्रीवादळाचा विपरीत परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

'दाना' चक्रीवादळाच्या प्रभावामुळे अनेक प्रवासी रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या. भुसावळ विभागातून सुटणाऱ्या पाच गाड्यांचा त्यामध्ये समावेश आहे. रेल्वे गाड्यांमध्ये सध्या प्रवाशांची प्रचंड गर्दी आहे. ऐन सणासुदीच्या काळात रेल्वे गाड्या रद्द झाल्यामुळे प्रवाशांची प्रचंड अडचण होत आहे.




मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातून धावणाऱ्या गाड्यांवर चक्रीवादळाचा विपरीत परिणाम झाला. गाडी क्रमांक २२९७३ गांधीधाम - पुरी एक्सप्रेस गांधीधाम येथून २३ ऑक्टोबर रोजी सुटली नाही. त्यामुळे २४ ऑक्टोबरला ही गाडी मध्य रेल्वेच्या स्थानकांवर येणार नाही. गाडी क्रमांक २२८६५ लोकमान्य टिळक टर्मिनस - पुरी एक्सप्रेस २४ ऑक्टोबर रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून रद्द केली. गाडी क्रमांक २०८२४ पुरी - अजमेर एक्सप्रेस २९ ऑक्टोबर रोजी पुरी येथून रद्द, गाडी क्रमांक २२९७४ पुरी - गांधीधाम एक्स्प्रेस २६ ऑक्टोबर रोजी पुरी येथून रद्द आणि गाडी क्रमांक ०९०६० ब्रह्मपूर - उधना विशेष २५ ऑक्टोबर रोजी ब्रह्मपूर येथून रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना ही माहिती लक्षात ठेवावी आणि त्याची नोंद घ्यावी, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.भुसावळ विभागातील बडनेरा येथील 'यार्ड रीमॉडेलिंग'च्या कार्यासाठी 'पूर्व-नॉन इंटरलॉकिंग' दरम्यान काही प्रवासी गाड्या शॉर्ट टर्मिनेट करण्यात आल्या आहेत. या गाड्यांच्या नियोजित शेवटच्या व गाडी सुटण्याच्या स्थानकांमध्ये बदल केला. १९ ऑक्टोबरपासून प्रवासी गाड्यांचे 'शॉर्ट टर्मिनेशन'करण्यात आले असून ते २५ ऑक्टोबरपर्यंत कायम राहणार आहे. त्यामुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. ०१२१२ नाशिक रोड - बडनेरा मेमू विशेष मूर्तिजापूरपर्यंत, ०१३६५ भुसावळ - बडनेरा मेमू मूर्तिजापूरपर्यंत, ०१३६८ नरखेड - बडनेरा मेमू नवी अमरावती, ०१३७० नरखेड -बडनेरा मेमू नवी अमरावती येथे 'शॉर्ट टर्मिनेट' करण्यात आली. 'पूर्व-नॉन इंटरलॉकिंग' कामादरम्यान प्रवासी गाड्या सुटण्याच्या स्थानिकात बदल केला. ०१२११ बडनेरा-नाशिक रोड मेमू विशेष मूर्तिजापूर, ०१३६६ बडनेरा - भुसावळ मेमू मूर्तिजापूर येथून आपल्या नियोजित वेळेत सुटत आहे. ०१३६७ बडनेरा - नरखेड मेमू नवी अमरावती, ०१३६९ बडनेरा -नरखेड मेमू नवी अमरावती येथून आपल्या नियोजित वेळेत सुटत आहे. या बदलामुळे प्रवाशांना अडचणीचा सामना करावा लागत आहे.

## अनेक जाती धर्माच्या लोकांचे उपस्थितीत प्रताप अडसड यांनी दाखल केले उमेदवारी नामांकन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ चांदुर रेल्वे**

सध्या महाराष्ट्रत निवडणुकीचे बिगुल वाजले आहे, त्यानिमित्त विविध पक्षातील उमेदवार आपले नामांकन दाखल करत आहे, २४ नोव्हेंबर गुरुवार रोजी धामणगाव विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार प्रताप अडसड यांनी



अत्यंत साध्या सरळ पद्धतीने तर नामांकन दाखल करण्याकरिता आलेल्या जनतेने ताल मृदुंग भज नाच्या गजरात रस्त्यावर आपल्या नेत्यासोबत चालत होते, यावेळी तर नामांकन अर्ज दाखल करीत असताना मतदार संघातील तिन्ही तालुक्यातील धामणगाव नांदगाव आणि चांदुर रेल्वे येथील जनता स्फूर्तीने त्यांच्यासोबत होती, उमेदवारी अर्ज दाखल करण्याकरिता जात असताना सोबत आलेली जनते मधील महिला पुरुष हे हातात ताल मृदुंग घेऊन भजन म्हणत होत्या, यावेळी अमरावती येथील माजी खासदार नवनीत राणा सुद्धा उपस्थित होत्या, नामांकन अर्ज दाखल केल्यानंतर आमदार प्रताप अडसड माजी खासदार नवनीत राणा माजी खा अनील बोंडे, माजी खा सुरेश वाघमारे, डॉ विकास महात्मे माजी आ जगदीश गुप्ता, माजी आ साहेबराव तट्टे,प्रश्नात मुन उपस्थित होते.

## दिवाळीत अवकाशात मनमोहक घडामोडींची पर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अकोला**

दीपोत्सवाच्या काळात अवकाशात् देखील मनमोहक घडामोडींची पर्वणी राहणार आहे. या उत्सवात आकाश सुद्धा सहभागी होत असल्याने या दुहेरी आनंदाचा लाभ घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले.

थंडीची चाहूल लागली. पुढील आठवड्यापासून दिवाळी उत्सवाला प्रारंभ होईल. आकाशात देखील विविध घडामोडींची रेलचेल राहणार आहे. सूर्यमालेतील आठ ग्रहांपैकी मंगळ, बुध, गुरु, शूक्र आणि शनी ग्रह नुसत्या डोळ्यांनी पाहता येतात. सध्या संध्याकाळी पश्चिम आकाशात अधिराज्य गाजवणारा तेजस्वी शूक्र ग्रहाजवळ नुकताच बुध ग्रह आला आहे. याच वेळी पूर्व आकाशात वलयांकित शनी ग्रह कुंभ राशीत दिसेल. पहाटे पूर्व आकाशात वरच्या भागात लखलखीत गुरु ग्रह वृषभ राशीत तर मिथुन राशीत लालसर रंगाचा मंगळ असेल. उत्तर, दक्षिण दिशादर्शक तारे रात्रीच्या वेळी दिशा समजून घेण्यास उत्तरेचा ध्रुवतारा आणि दक्षिणेस अगस्त्य तारका सहायक ठरतात. ध्रुवताऱ्याची ओळख करून देण्यात सप्तर्षी व शर्मिष्ठा हे तारका समूह सोबत करतात. पृथ्वीच्या ज्या अक्षवृत्तावर असतो, तेवढ्याच अंशावर क्षितिजापासून ध्रुवतारा दिसतो, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले.आकाशगंगेपेक्षा मोठी असलेली देवयानी आकाशगंगा सध्या स्थितीत पूर्व




आकाशात डावीकडे नुसत्या डोळ्यांनी पाहता येईल. त्यापासून पृथ्वीचे अंतर सुमारे बावीस लक्ष प्रकाश वर्षे एवढे महाप्रचंड आहे. याचा अर्थ दर सेकंदाला तीन लाख कि.मी.जाणाऱ्या प्रकाशाला पृथ्वीवर यायला बाविस लाख वर्षे लागतील, असे दोड म्हणाले.

दरताशी २८ हजार ५०० कि.मी या प्रचंड वेगाने फिरणारे अंतराळ संशोधन केंद्र दर दीड तासात एक पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करते. आपल्या भागात आल्यावर ते आकाशात फिरत्या चांदणीच्या स्वरूपात बघता येईल. याशिवाय उत्तरेचा ध्रुवतारा सप्तर्षी व शर्मिष्ठा तारका समूहाचे आधारे, शौरी, तिमिंगल, ययाती व देवयानी, सारथी, कालेय, कृत्तिका, हंस, गरूड, मृग आदी तारका समूह अनमोल खजिन्याचे रूपात बघता येतील, असे देखील प्रभाकर दोड यांनी सांगितले.

**आकाशात आतषबाजी**

दिवाळी सणाच्या उत्सवात फटाक्यांची आतषबाजी केल्या जाते. प्रकाश उत्सवामध्ये ऑक्टोबरच्या उत्तरार्ध व नोव्हेंबरच्या पूर्वार्धात उल्का वर्षाव होतांना आकाशात दिसेल. विविधरंगी उल्का रात्री १० नंतर पूर्व आकाशात पहाटेपर्यंत पाहता येतील. उल्का धुमकेतूचे वस्तूकण आहेत. ते गुरुत्वाकर्षणाने पृथ्वी कक्षेत येऊन वातावरणात पेट घेतल्याने लाल, पिवळ्या, निळ्या पांढऱ्या रंगाच्या प्रकाशरेषा दिसतात, असे दोड म्हणाले.

# महाराष्ट्राला यशोमती ठाकूर सारख्या बुलंद व कणखर नेतृत्वाची गरज : आ. विनेश फोगाट

## नामांकन रॅली व सभेला नागरिकांची अफाट गर्दी : महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर चा नामांकन अर्ज दाखल : तिवसा येथे लोकनेत्या यशोमती ठाकूर यांचे शक्तिप्रदर्शन







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

महिलाच नव्हे तर युवकांवर देखील अन्याय करणाऱ्या भाजप प्रणित सरकारला पराभूत करून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार निवडून आणा. यशोमती ठाकूर सारख्या बुलंद व कणखर नेतृत्वाची समाजाला व पर्यायाने महाराष्ट्राला गरज असून या आपल्या बहिणीला हरविण्यासाठी विरोधक षडयंत्र रचतील परंतु आपण कोणत्याही भ्रमात न राहता यशोमती ठाकूर यांचा बुलंद आवाज विधानसभेत पोहचवा असे आवाहन प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आ. विनेश फोगाट यांनी केले. महाविकास आघाडीच्या उमेदवार लोकनेत्या यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ आयोजित विराट सभेत आ. विनेश फोगाट बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय मंत्री अरुण यादव,मध्यप्रदेशचे माजी मंत्री सुखदेव पांसे,खा. बळवंत वानखडे,वर्धा येथील खा. अमर काळे, यवतमाळ येथील खासदार संजय देशमुख,माजी मंत्री अनिलबाबू देशमुख आ. धीरज लिंगाडे,बबलू देशमुख, वीरेंद्र जगताप दिलीप एडतकर, सुनील देशमुख, विलास इंगोले, बबलू शेखावत,शाम देशमुख, यांची उपस्थिती होती.महाविकास आघाडीच्या हजारो कार्यकर्ते व जनताजनार्दन यांच्यां उपस्थितीत यशोमती ठाकूर यांनी आज तिवसा विधानसभा मतदार संघासाठी नामांकन दाखल केले. आ. यशोमती ठाकूर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी महाविकास आघाडी व घटकपक्षाचे हजारो कार्यकर्ते तिवसा येथील समर्थ आडकूजी महाराज नगर सातरगाव रोड येथील मैदानावर जमले होते. प्रारंभी नामांकन रॅली काढून यशोमती ठाकूर यांनी अफाट सभा घेतली.मोठ्या शक्तीप्रदर्शनात त्यांनी आपला नामांकन अर्ज दाखल केला. यावेळी पुढे बोलतांना विनेश फोगाट म्हणाल्या की,यशोमती ठाकूर या बहादूर बेटी व बहीण आहे. यशोमतींचा आवाज म्हणजे तुमचा आवाज.यशोमती ठाकूर सारख्या महिला निर्माण झाल्यास महिलांवर अत्याचार होणार नाहीत असा विश्वास आ.फोगाट यांनी व्यक्त केला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री अरुण यादव यांनी केंद्र सरकार सोबतच राज्य सरकारचा समाचार घेत यशोमती ठाकूर सारख्या जनतेच्या पाठीराख्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्यांनी निवडून देण्याचे आवाहन नागरिकांना केले. यावेळी माजी मंत्री सुखदेव पांसे यांनी यशोमती सारख्या विकासाभिमुख नेतृत्वाची आज गरज असल्याचे म्हटले. यावेळी त्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. यावेळी माजी मंत्री अनिलबाबू देशमुख व अमर काळे यांनी देखील आपले विचार व्यक्त केले.भाजपा व महायुतीच्या उमेदवारांची लोकसभेत कशी दयनीय अवस्था झाली याची सर्वांनाच कल्पना आहे त्याची धास्ती घेऊन विद्यमान सरकारने अनेक योजनांचे प्रलोभन जनतेला दाखविले. अश्या फोकनाड सरकारला खाली खेचण्याची वेळ आली असून आता महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होणार असा आशावाद महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी व्यक्त केला.

### तुमची साथ, तुमचा आशीर्वाद हाच माझा विश्वास : यशोमती ठाकूर

तुमचे प्रेम,आशीर्वाद,विश्वास माझी ताकद आहे.कोणत्याही संकटांचा सामना करण्यासाठी तुमची साथ पुरेशी आहे. ही लढाई नुसती निवडणूकी पुरती नसून संविधान वाचविण्यासाठी आहे. विद्यमान सरकारने तुमचा विश्वासाघात केला.शेतीमालाला आजही पंधरा वर्षांपूर्वीचेच भाव आहे. फसव्या योजना काढून भाजप प्रणित सरकारने मतदारांना आमिष दाखविले आहे. आपल्याला कोणत्याही प्रलोभनांना बळी पडायचे नाही.पक्ष व घर फोडण्याचे काम करणाऱ्या लोकांना संविधानाची ताकदच येणाऱ्या काळात दाखवावी लागेल यासाठी सजग राहून महाविकास आघाडीला भक्कम साथ द्या. विकास करणाऱ्यांच्या पाठीशी राहा.संविधान वाचविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्यांनी निवडून आणण्याचे आवाहन तिवसा विधानसभा मतदार संघाच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांनी केले.

### यशोमती ठाकूर यांनी विकासाची गंगा आणली : खा. बळवंत वानखडे

याप्रसंगी बोलतांना खा. बळवंत वानखडे यांनी म्हटले की, यशोमती ठाकूर यांनी तिवसा विधानसभा मतदार संघात विकासाची गंगा आणली.त्यांनी विविध विकासकामे करून जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात देखील आपले नेतृत्व सिद्ध केले आहे. हे नेतृत्व आपण जपलं पाहिजे असं नेतृत्व लाभण आपल्या जिल्ह्याचे भाग्य आहे आहे त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत यशोमती ठाकूर यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणावे असे आवाहन यावेळी खा.बळवंत वानखडे यांनी केले.

# प्रचारकार्यात स्थानिक नेत्यांसह गावपुढारी सक्रिय : युवावर्ग निवडणूक काळात झाला अधिक सक्रिय

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अचलपूर**

विधानसभा निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. निवडणुकीची रणधुमाळी सुरू होताच विविध राजकीय पक्षांचे पुढारी राजकारणात सक्रिय झाले आहेत. ग्रामीण भागात विविध राजकीय पक्षांचे स्थानिक राजकीय नेते, जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीचे माजी पदाधिकारी व सदस्य, ग्रामपंचायतीचे आजी माजी पदाधिकारी प्रचार कार्यात व्यस्त झाले आहेत. समाजातील विविध घटकांचे प्रश्न, विकासकामांचे मुद्दे मांडून विरोधी गटापेक्षा आपल्या पक्षाचे विचार पटवून देण्यात येत आहेत. निवडणूक जवळ येत असल्याने राजकीय पक्षांचेप्रचार कार्य रंगात आले आहे. सोशल मीडिया वापरामुळे ग्रामीण भागातील युवावर्ग निवडणूक काळात अधिक सक्रिय झाल्याचे दिसत आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंतची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून क्षणात उपलब्ध होत असल्याने ग्रामीण भागातील मतदार आपल्या अनेक समस्या,



विविध प्रश्न प्रचारासाठी येणाऱ्या स्थानिक नेत्यांसह उमेदवारांच्या समर्थकांसमोर मांडत आहेत. आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रमुख राजकीय पक्षांचे नेते आपापल्या कामात तर, स्थानिक नेते आणि पदाधिकारी प्रचार कार्यात व्यस्त झाले आहेत. गावपातळीवरील मतदार उमेदवारांच्या समर्थकांना थेट प्रश्न करीत असल्याने समर्थकांना मतदारांच्या समस्याविषयक प्रश्नांना उत्तरे देताना नाकीनऊ येत आहे.

### पुढाऱ्यांकडून नमस्कार, चमत्कार

गावात मिळणाऱ्या मताधिक्यांवरच गावपुढाऱ्यांचे वजन ठरते. मात्र, मीडियामधून सादर होणारी वास्तविकता आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे मतदार आता सजग झाला आहे. चांगल्या व वाईटाचाही विचार करू लागले आहेत. मतदानाचा दिवस जवळ येईपर्यंत गावखेड्यात अनेक घडामोडी घडणार आहेत. गावातील मताधिक्य गावपुढाऱ्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करीत असल्याने व्होटबँक टिकविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी धडपड सुरू केली आहे. काही हौसे गौसे गावपुढारी आर्थिक झळ सोसूनही मतदारांना खूश ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. नमस्कार, चमत्कार करून स्वतःकडे लक्ष वेधून घेत आहेत.

# जिल्ह्यात आज ६ उमेदवारांचे नामांकन अर्ज दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती,**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत नामांकन अर्ज दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी सहा उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. धामणगाव रेल्वे, बडनेरा, तिवसा, दर्यापूर, मेळघाट आणि मोर्शी मतदारसंघात उमेदवारांनी अर्ज दाखल केले. अचलपूर आणि अमरावती मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आलेला नाही.

३६ धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात प्रताप अरूणभाऊ अडसड – भाजपा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

३७ बडनेरा विधानसभा मतदारसंघात राहुल लक्ष्मणराव मोहोड – भारतीय युवा जन एकता पार्टी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

३९ तिवसा विधानसभा मतदारसंघात ड. यशोमती चंद्रकांत ठाकूर – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

४० दर्यापूर विधानसभा मतदारसंघात कॅप्टन अभिजित आनंद अडसूळ – शिवसेना यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

४१ मेळघाट विधानसभा मतदारसंघात मोतीलाल बाटू ठाकरे– बहुजन समाज पक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

४३ मोर्शी विधानसभा मतदारसंघात विपूल नामदेवराव भडांगे – अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

# हंगाम, दिवाळी अन् निवडणुकीचा त्रिवेणी संगम




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

विधानसभा निवडणूक म्हणजेच लोकशाहीचा उत्सव. या उत्सवाची सर्वांनाच उत्सुकता लागलेली असते. सध्या रब्बी हंगामाची तयारी, त्यातच अवघ्या काही दिवसांवर आलेली दिवाळी अशी धामधूम असतानाच विधानसभा निवडणूकही आली. अर्थातच, खरिपात रब्बी हंगाम, निवडणूक, दिवाळी असा त्रिवेणी संगम जुळून आला आहे. या त्रिवेणी संगमामध्येच खरीप हंगामातील उरल्यासुरल्या पिकांची काढणीही आलीच. अशावेळी विधानसभा निवडणुकीचा प्रचार करावा की, शेतातील कामे उरकावी, असा संभ्रम ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला आहे.

ग्रामीण भागात शेतशिवारात धान काढणीसह रब्बीच्या हंगामाची तयारी सुरू झाली आहे. त्यातच आता विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे.

गावगाड्यात शेतीच्या कामामुळे शुकशुकाट जाणवत आहे. पारावर, कट्ट्यावर, चावडीवर, सार्वजनिक ठिकाणी सकाळी व रात्री उशिरापर्यंत सध्या विधानसभा निवडणुकीच्याराजकीय चर्चाचे फड रंगत आहेत. अजून उमेदवार जाहीर व्हायचे बाकी असून, कोणता उमेदवार येणार, कोणत्या पक्षाचा उमेदवार प्रबळ ठरेल, कोण जिंकणार, याबाबत खमंग चर्चा रंगत आहेत.याचवेळी आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याचीही काळजी घेतली जात आहे.

गावखेड्यातील राजकारणाचे वातावरण हे दिवाळीच्या दिवसांत तापणार आहे. सध्या उमेदवार निवडीची प्रक्रिया असली तरी गावात उमेदवारावरुन तर्क वितर्क बांधले जात आहे. त्यामुळे निवडणुकीत रंगत येऊ शकते.

कलर बॉक्सविविध प्रश्नांवर चर्चा

प्रत्येक जण आपापल्यापरीने अंदाज मांडत आहेत. निवडणुकीनिमित्ताने राजकीय गप्पांनाही उधाण आले आहे, यात अनेक प्रकारच्या प्रश्नांवर चर्चा होत आहे. निवडणु-कीमध्ये प्रामुख्याने शेती, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण, पाणी व वीज प्रश्न, सिंचन योजना,शेतमालाचे भाव, बेकारी, बेरोजगार आदी मुद्दे प्रचारात असतील काय? यावरही चर्चा होत आहे.